## बत्तिसावा दीक्षांत समारंभ

## दि. २० फेब्रुवारी २०१६

## मा. कुलगुरू डॉ. मोहन खेडकर यांचे प्रास्ताविकपर भाषण

उपस्थित सर्वांना नमस्कार!

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बत्तिसाव्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी मुंबई येथील रसायन तंत्रज्ञान संस्थेचे (आय.सी.टी.चे) अध्यक्ष पद्मश्री मा. डॉ. जी. डी. यादव, समारंभास उपस्थित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सर्व माजी कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषदेचे सर्व आजी-माजी सन्माननीय सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विविध पूर्व-प्राधिकरण सदस्य, उपस्थित लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि माझ्या विद्यार्थी मित्रमैत्रिणींनो..

विद्यापीठाच्या बत्तिसाव्या दीक्षांत समारंभात कुलगुरू म्हणून मी आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करतो.

सर्वप्रथम, आजच्या दीक्षांत समारंभास लाभलेले प्रमुख अतिथी पद्मश्री मा. डॉ. गणपती यादव यांचा थोडक्यात परिचय करून देतो. डॉ. गणपती यादव हे मुंबई येथील रसायन तंत्रज्ञान संस्था (आय.सी.टी.) या अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू असून विख्यात प्राध्यापक तसेच जगदीशचंद्र बोस राष्ट्रीय फेलो म्हणून त्यांचा लौकिक आहे. मेलबोर्न-ऑस्ट्रेलिया तसेच सासकेटन-कॅनडा येथील विद्यापीठात ते ॲडजंक्ट प्रोफेसर राहिले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली रसायन तंत्रज्ञान संस्थेची मोठी भरभराट झाली आहे. या संस्थेस २०१२मध्ये उत्कृष्ट केंद्र (सेंटर ऑफ एक्सलंस) म्हणून महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाली. लेखक म्हणून त्यांनी तीन पुस्तके लिहिली असून आतापर्यंत त्यांचे ३३० शोधनिबंध प्रकाशित झालेत. एच इंडेक्स ४४, आय१० इंडेक्स १६४, तर पुस्तके, लेख, पेटंट्स इत्यादी मिळून ७३०० उद्धृते (सायटेशन्स) त्यांना प्राप्त झाले आहेत. त्यांच्या नावावर ७५ पेटंट्स असून आतापर्यंत त्यांनी ८३ संशोधकांना पीएच.डी.साठी मार्गदर्शन केले आहे.

डी. एम. त्रिवेदी जीवनगौरव पुरस्कार, डॉ. बी. पी. गोदरेज जीवनगौरव पुरस्कार, उत्कृष्ट संशोधक पुरस्कार असे विविध पुरस्कार त्यांना प्राप्त झालेत. इंग्लंडच्या रॉयल सोसायटी

ऑफ केमेस्ट्रीची त्यांना फेलोशिप मिळाली. विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील त्यांच्या बहुमोल कामगिरीचा परिपाक म्हणजे भारत सरकारने २०१६चा पद्मश्री पुरस्कार बहाल करून त्यांना सन्मानित केले आहे.

शिक्षण, संशोधन यांव्यतिरिक्त साहित्य, तत्त्वज्ञान, व्युत्पत्तिशास्त्र यांमध्ये डॉ. गणपती यादव यांना रुची असून संस्कृत भाषेविषयी विशेष आस्था आहे. त्यांचा एक वेगळा आणि विशेष छंद म्हणजे ते मराठी आणि इंग्रजीतून कवितालेखन करतात.

असे व्यासंगी व्यक्तिमत्त्वाचे धनी अतिथी म्हणून आजच्या दीक्षांत समारंभाला लाभले आहेत. त्यांचे मी मनापासून स्वागत करतो.

मित्रहो, दि. १ मे १९८३ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. गेली ३२ वर्षे विविध शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयांच्या माध्यमातून विद्यापीठ ज्ञानदानाचे पवित्र कार्य करीत आहे. आज या विद्यापीठाशी **४१३** महाविद्यालये संलग्नित असून त्यापैकी **१२५** महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 2 (f) / 12 (B) सूचीमध्ये समाविष्ट झालेली आहेत. विविध महाविद्यालये तसेच विद्यापीठातील विभागांतून नऊ विद्याशाखांतर्गत पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण दिले जाते. २०१६ च्या उन्हाळी परीक्षेमध्ये विविध विद्याशाखांमधील एकूण **५९०** परीक्षांना, अंदाजे **३,१५,०००** परीक्षार्थी प्रवेशित आहेत. आजच्या दीक्षांत समारंभामध्ये विविध विद्याशाखांमधील **३३८** संशोधकांना आचार्य पदवी प्रदान करण्यात आली तसेच **१०१ सुवर्णपदके, २२ रौप्यपदके आणि २४ रोख पारितोषिकांचे** वितरण करण्यात आले. विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील सारणी तक्त्यांचे डिजिटीलायझेशन करण्यात येत आहे. तसेच Examination Reform अंतर्गत राजेश अग्रवाल समितीच्या शिफारशीवरून EMS (Exm. Management system) मध्ये ICT द्वारा परीक्षेच्या आवेदन पत्रापासून गुणपत्रिका प्रदान करण्यापर्यंत (End to End Solution) सर्व प्रक्रिया पार पाडण्यात येतील. या योजनेची अंमलबजावणी सुरू झालेली आहे. परीक्षेसंबंधी विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणीपासून मुक्तता देण्याचा हा आमचा प्रयत्न आहे. महाराष्ट्रातील विद्यापीठामध्ये हा प्रयोग पूर्णपणे राबवणारे बहुदा हे पहिलेच विद्यापीठ असावे.

उच्च शिक्षण देण्याचे कर्तव्य पार पाडत असतानाच त्याविषयीची गुणवत्ता उंचावत ठेवण्याचा विद्यापीठाचा कायम ध्यास असतो. आपल्या शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यमापन करून

घेण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बंगलोरला (नॅकला) 'स्वयं अध्ययन अहवाल' (सेल्फ स्टडी रिपोर्ट) सादर केला होता. नॅकला सामोरे जाण्याची ही आपली तिसरी वेळ (थर्ड सायकल) होती. मागच्या वेळी विद्यापीठाला **२.६३** असे गुणांकन व 'ब' श्रेणी प्राप्त झाली होती. यावेळी अलीकडेच झालेल्या मूल्यांकनातून आपल्या विद्यापीठाला **३.०७** असे गुणांकन व **'अ'** श्रेणी प्राप्त झाली. विद्यापीठाच्या इतिहासात नॅककडून 'अ' श्रेणी प्राप्त होण्याची ही पहिलीच वेळ आहे. या यशाबद्दल कुलगुरू म्हणून मी आनंद व्यक्त करतो. ही कामगिरी साध्य करण्यासाठी विद्यापीठातील शेवटच्या कर्मचाऱ्यापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचेच योगदान लाभले. पाच वर्षांतील कामगिरीच्या मूल्यमापनाची ही फलश्रुती असल्याने व्यवस्थापन परिषद, अधिसभा, विद्यासभा, संबंधित सर्व प्राधिकरणांनी व संलग्नित महाविद्यालयांनी जे उत्तम कार्य केले त्याविषयी मी समाधान व्यक्त करतो. तसेच विद्यापीठाचा नावलौकिक उंचावण्यासाठी हातभार लागलेल्या सर्वांचे आभार मानतो.

नॅकद्वारे पाहणी करण्यासाठी आलेल्या राष्ट्रीय पातळीवरील दहा तज्ज्ञांच्या चमूने आपल्या अहवालात विद्यापीठातील सोयी-सुविधांची तसेच वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची नोंद केली. त्यातील काही बाबी अशा :

- वृक्षवेलींनी नटलेला उत्तम भौतिक सोयीसुविधांनी सज्ज एकात्म शैक्षणिक परिसर.
- **८३** पूर्णवेळ शिक्षकांपैकी **६३** पीएच.डी.प्राप्त शिक्षक.
- कार्यक्षम माहिती-तंत्रज्ञान प्रणालीवर आधारित परीक्षा पद्धती.
- नेट-सेट-गेट आणि अभ्यासपूरक अभ्यासक्रमांमध्ये वृद्धी.
- एकूण अर्थसंकल्पाच्या **८.७३** टक्के तरतूद संशोधनासाठी.
- पुस्तकलेखन आणि उत्तम एच इंडेक्स, इम्पॅक्ट फॅक्टरसह शोधनिबंध यांत अग्रेसर.
- नोंदणी झालेल्या २४ पेटंट्सपैकी ७ पेटंट्स प्रकाशित.
- मल्टी-मिडिया साधनांसह आधुनिक सुसज्ज स्मार्ट क्लासरूम्स.
- १२०० संगणक इंटरनेट-इंट्रानेट सुविधांसह उपलब्ध.
- ग्रंथालय कंसोर्शियाच्या साहाय्याने संलग्नित महाविद्यालयांशी जोडलेले ग्रंथालय .
- युवक महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आणि क्रीडा क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी.
- विविध अध्यासनांच्या माध्यमातून मूल्यशिक्षण आणि सामाजिक जाणीवजागृती.

- ऊर्जाबचत उपायांची अंमलबजावणी.
- जलव्यवस्थापन, जलपुनर्भरण, सौरउर्जा, पर्यावरणपूरक उपाययोजना.
- संत गाडगे बाबांच्या विचारांनी प्रेरित क्रियाशील आणि शीस्तबद्ध विद्यार्थी-शिक्षक.
- कमवा-शिका योजनेद्वारे विद्यार्थ्यांना व्यापक प्रमाणात साहाय्य.
- रॅगिंगमुक्त सुरक्षित शैक्षणिक परिसर.
- विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक कौशल्यांचा निरंतर विकास.

मित्रहो, नॅकच्या संदर्भात आपण गुणवत्तेची २.६३वरून ३.०७पर्यंत जी उडी घेतलेली आहे, ती काही साधी नव्हे. पण ती आपण घेऊ शकलो, हे खरे आहे. याचा अर्थ असा की, कठोर निश्चयाने आपण यश साध्य करू शकतो. " **निश्चयाचे बळ तुका म्हणे तेचि फळ**" हे ध्यानात घेऊन यापुढे गुणवत्तेची नवनवी उड्डाणे आपण घेतली पाहिजे. त्याचा फायदा या परिसरातील विद्यार्थ्यांना पर्यायाने समाजाला, राज्याला/देशाला होईल.

उच्चतम गुणवत्ता गाठण्याचा प्रवास आपला सुरू झालेला आहे. मला नेहमीच वाटत असते की, "**Quality is a journey, its never a destination.**" गुणवत्तासंपादन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. ती कधीच संपत नाही. आणखी महत्त्वाचे म्हणजे, "**Quality is not to be controlled but it is to be caused.**" गुणवत्तेच्या बाबत ती नंतर काही सुधारणा करून हस्तगत करू वगैरे दृष्टी न बाळगता मुळातच अव्यंग, निर्दोष स्वरूपाच्या श्रेष्ठतम पर्यायांचा स्वीकार केला पाहिजे. असे केल्याने आपण गुणवत्तेबाबत अधिकाधिक परिपूर्ण होत जाऊ, यात शंका नाही.

विद्यापीठाप्रमाणे संलग्नित महाविद्यालयांपैकी नऊ महाविद्यालयांनी बंगलोर येथील राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषदेतर्फे 'अ' श्रेणी प्राप्त केलेली असून अनेक महाविद्यालयांनी मूल्यांकन करून घेतले आहे. उर्वरित महाविद्यालये मूल्यांकनाच्या प्रक्रियेत सामील झाली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विद्यापीठाला प्राप्त होणाऱ्या अनुदानातून शैक्षणिक विकासात्मक कामे प्रगतिपथावर आहेत.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधून संशोधनप्रकल्प राबविले जात आहेत. संशोधनाला चालना देण्यासाठी विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयांमार्फत विविध विषयांवर चर्चासत्र-

परिषदांचे आयोजन होत असते. या वर्षी नोव्हेंबर २०१५मध्ये विद्यापीठातील गणित विभागातर्फे व्यापक सापेक्षतेवर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. रसायनशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. तर मराठी विभाग, शिक्षण विभाग, वनस्पतिशास्त्र विभाग, उपकरणशास्त्र विभाग व गृहविज्ञान विभाग यांनी विविध कार्यशाळांचे आयोजन केले.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधील तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना विविध मानसन्मान प्राप्त झाले आहेत. विद्यापीठातील काही विभागातील प्राध्यापकांनी आंतरराष्ट्रीय प्रकल्प, चर्चासत्र परिषदांतून सहभागी होत विद्यापीठाचा नावलौकिक उंचावला आहे.

शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय पुरस्कारासाठी उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी व उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच स्वयंसेवक यांची निवड झाली. दि. २० डिसेंबर २०१५रोजी गाडगे बाबांच्या विचारानुसार कार्य करण्याबद्दल 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०१५' विद्यापीठातर्फे प्रदान करण्यात आला.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीचे अंग विकसित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सत्र २०१५-१६मध्ये स्वच्छ भारत-स्वस्थ भारत अभियान, वृक्षारोपण, ग्रामविकास उपक्रम, आरोग्य शिबिरे, पर्यावरण व वन्यजीव संवर्धन जनजागृती इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आलेत. दि. २१ जून २०१५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

सलग यावर्षीसुद्धा विविध कला व क्रीडा स्पर्धांमध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली. सप्टेंबर २०१५मध्ये जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव येथे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. बुंदेलखंड विद्यापीठ, झाशी येथे नोव्हेंबर २०१५मध्ये संपन्न झालेल्या मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत समूहगान भारतीय, समूहनृत्य, वक्तृत्व स्पर्धा, फोक ऑर्केस्ट्रॉ या प्रकारांत विद्यापीठ चमूने **प्रथम** तर सुगम संगीत, एकांकिका, प्रहसन (स्किट), स्वरवाद्य, पाश्चिमात्य समूहगान या प्रकारांत द्वितीय क्रमांक प्राप्त केला तर संगीत प्रकारात विजेता ट्रॉफी, तसेच वरील संपूर्ण कलाप्रकार मिळून एकत्रित **चॅम्पिअन ट्रॉफी** विद्यापीठ चमूने पटकावत नेत्रदीपक यश मिळविले. ही विद्यापीठासाठी गौरवाची बाब आहे.

या वर्षी महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सव २०१५ या स्पर्धेत समूहनृत्य या प्रकारात विद्यापीठास **प्रथम** तर समूह संगीत, समूहगान भारतीय या प्रकारात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.

जानेवारी २०१६मध्ये पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धा (मुली) विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत पश्चिम विभागातील ३६ संघांनी सहभाग घेतला. नांदेड येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव 'अश्वमेध' २०१५ या स्पर्धेत विद्यापीठाने व्हॉलीबॉल(मुले) या प्रकारात **प्रथम** स्थान पटकावले. याव्यतिरिक्त पतियाळा (पंजाब) येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत धनुर्विद्या-रिकव्हर(मुले) या प्रकारात विद्यापीठ चमूने **प्रथम** स्थान प्राप्त केले.

पुणे येथे संपन्न झालेल्या 'आविष्कार' स्पर्धेत विद्यापीठ चमूने उत्तम कामगिरी केली. सर्व यशस्वी खेळाडू, कलावंत तसेच संशोधक विद्यार्थ्यांचे मी कुलगुरू या नात्याने अभिनंदन करतो.

विद्यार्थी कल्याण विभागामार्फत अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत. सत्र २०१५-१६मध्ये विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती अंतर्गत एकूण १९४ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली.

विद्यापीठ ग्रंथालयाच्या माध्यमातून विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. ग्रंथालयात १,०८,९८५ ग्रंथ, १२६ इ-बुक्स, २३४२ प्रबंध. ७०८७ डिजीटाइज्ड प्रती इत्यादी ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. बुक बँक, लायब्ररी पोर्टल, इ-रिसोर्स ॲक्सेस सेंटर, वेब ओपॅक, रिमोट रिसोर्स ॲक्सेस इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. ग्रंथालयाच्या पोर्टलचा उपयोग जगात २५पेक्षा अधिक देशातील वाचक करीत आहेत. या इ-ग्रंथालयास आजपर्यंत साडेतीन कोटीपेक्षा अधिक हिट्स मिळाल्या असून त्यातून ६२ लाखापेक्षा अधिक पृष्ठ डाऊनलोड करण्यात आले आहेत. दि. १५ ऑक्टोबर २०१५ रोजी वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला.

यावर्षी विद्यापीठाच्या निसर्गरम्य परिसराचे आपण केंद्र शासनाच्या नागपूर येथील National Environmental Engineering Research Institute या मान्यताप्राप्त संस्थेकडून पर्यावरणीय मूल्यमापन (Green Audit) करून घेतले आहे. हिरवाईने नटलेला समृद्ध वृक्षराजींचा हा प्रदूषणमुक्त परिसर असाच चांगला टिकवून ठेवण्याचे पर्यावरणीय कर्तव्य सर्व घटक पार पाडतील, अशी मी अपेक्षा बाळगतो.

मित्रहो, आता काही महत्त्वाच्या बाबींविषयी मी विद्यार्थी मित्रांशी संवाद साधू इच्छितोः

१) आजच्या जीवनात वैयक्तिक आशा-आकांक्षांना आपण फार महत्त्व देत चाललो आहोत. समाजाप्रतिची आपली संवेदना हरवत चालली आहे. पण आजही आपल्या अवती-भवती अशी माणसं सापडतात की जी समाजातील इतर व्यक्तींसाठी आपले काही योगदान देऊ पाहतात. बुलडाणा जिल्ह्यातील देऊगाव माळी येथील राम मगर या युवकाच्या अपघाती मृत्यूनंतर, आपला मुलगा गमावणारी गरीब माता काळजावर दगड ठेवून रामच्या अवयवांचे गरजू व्यक्तींसाठी दान करते. आणि अशा कृतीतून इतरांच्या जीवनात आनंद फुलवते. आपल्या ग्रामीण भागातील दुःखात असलेल्या मातेने हे जे केले त्यापासून आपल्याला निश्चितच प्रेरणा घेता येईल.

२) मित्रहो, समाजासाठी कळवळा असणाऱ्या अशा व्यक्तींना आपले रोल मॉडेल्स म्हणून आपल्याला स्वीकारता येईल. डॉ. प्रकाश आमटे, डॉ. रवींद्र कोल्हे, डॉ. राणी-अभय बंग दाम्पत्य, तसेच शंकरबाबा पापळकर इत्यादि निःस्वार्थबुद्धीने काम करणाऱ्या व्यक्ती आपले रोल मॉडेल असायला हरकत नाही.

३) सुशिक्षित व्यक्ती म्हणून समाजाच्या आपल्याकडून निश्चितच काही अपेक्षा आहेत. एक जबाबदार नागरिक म्हणून- समाजाची शांतता व सुरक्षितता जतन करणारा, समाजाच्या भौतिक सोयी-सुविधांची नासधूस न करणारा, राष्ट्राच्या उभारणीत हातभार लावणारा व्यक्ती म्हणून, आपण घडावे.

४) समाजापासून "मला काय मिळालं?" यापेक्षा समाजाला "मी काय दिलं?" याचा नेहमी विचार केला पाहिजे. प्रत्येकाने "मी करावं" ही भावना वाढिला लागली पाहिजे. "तो करेल" हे नको.

५) सतत स्वागतशील असलं पाहिजे. दोषारोपणच करत राहाण्याची नकारात्मक वृत्ती बदलली पाहिजे. त्याऐवजी प्रयत्न करून दोष दूर करण्यासाठी सहकार्य करण्याची वृत्ती वाढिला लागली पाहिजे.

६) आजचा तरुण व्हॉट्स ॲप, फेसबुक अशा सोशल मिडियाच्या आहारी जायला लागला आहे. सोशल मिडियाचा वापर तरुणांनी विवेकाने करावा. अन्यथा त्याच्याजवळ वाचन, अभ्यास

यांसाठी वेळच उरणार नाही. त्यामागील वेळ वाचवून व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यावर भर द्यावा.

७) यशस्वी होण्यासाठी स्थिर वृत्ती, पूर्वग्रहरहित मन अधिक महत्त्वाचे ठरते. पेनल्टी शूटरचा अभ्यास करणाऱ्या संशोधकाने असा निष्कर्ष काढला की, गोलकीपरला गोल वाचविण्याची सर्वोत्तम संधी तो स्थिर असतो तेव्हाच मिळते. तरीही ९२ टक्के खेळाडू दोनपैकी कोणत्यातरी एका अंगाकडे झेप घेताना दिसतात. कृतीकडे पाहण्याची पूर्वग्रहदूषित नजर याला कारणीभूत ठरते. शांत राहून कदाचित हवा तो परिणाम मिळवणे सहज शक्य असते.

८) शेवटी मी, आपले एका बोधकथेकडे लक्ष वेधू इच्छितो. महान चित्रकार, शिल्पकार मायकेल अँजलोच्या फ्लॉरेन्सस्थित जगप्रसिद्ध १८फुटी डेव्हीड या पुतळ्याची कथा लक्षात घेण्यासारखी आहे. हा पुतळा ज्या संगमरवरी प्रचंड ठोकळेवजा तुकड्यातून घडविल्या गेला तो पूर्वी अनेक वर्षे तसाच पडून होता. लिओनार्दो-दा-विंचीसह अनेकांनी हा दगड निकामी व दोषपूर्ण ठरवला होता. अशा दगडावर मायकेल अँजलोने काम सुरू केले आणि त्या वाया गेलेल्या दगडातून अलौकिक अशी प्रतिभा साकार केली. मायकेल त्यावर काम करत असताना एका मुलाने त्याला विचारले की, "तो असा दगडावर हातोडा का आपटत बसला आहे?" मायकेलने त्याला उत्तर दिले, "तरुण मुला, यात एक देवदूत राहतो. मी त्याला मुक्त करत आहे."

मित्रहो, दगडातून अलौकिक सौंदर्य साकार करणारे मायकेल अँजलो तुम्ही बना. तुमचे कार्य जगाला दीपवित राहील. ते सामर्थ्य आपल्यात नक्कीच असते. या बोधकथेतला आणखी एक अर्थ आपल्याला ध्यानात घेता येईल. तो म्हणजे, तुमच्यातला देवदूत बाहेर येण्याची वाट पाहात आहे. त्यामुळे तुम्ही योग्य शिल्पकाराच्या योग्य प्रकारच्या शिक्षणरूपी संस्काराच्या सानिध्यात या. यातून तुमची तेजस्वी मूर्ती बाहेर येईल व ती जगाला दीपवत राहील.
मित्रहो, गुणवत्ताच शेवटी श्रेष्ठ ठरते.

गुणाः सर्वत्र पूज्यन्ते, पित्रृवंशो निरर्थकः

वासुदेवं नमस्यन्ति, वसुदेवं न मानवाः

व्यक्तीचे गुण सर्वत्र पूजनीय असतात, आपण कोणाच्या वंशात जन्म घेतला यास महत्त्व नाही. आजही आपण वासुदेवाला (श्रीकृष्णाला) नमस्कार करतो. पण त्याचे वडील वसुदेवाला करीत नाही.

पुन्हा एकदा सर्वांचे स्वागत करतो तसेच पदवी, पदके व पारितोषिके प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

**धन्यवाद !**

**जय हिंद, जय महाराष्ट्र !**